*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

**NAVJYOT / Vol. XII / Issue - II** **ISSN 2277- 8063**

# श्री बापू तुकाराम गुरव : एक अपरिचित स्वातंत्र्यसैनिक

**श्री. संदीप बळवंत गुरव( माजी सैनिक),** पीएच.डी. संशोधक विद्यार्थी,
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर., armysandip01@gmail.com

---

**प्रस्तावना –**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना हया स्वातंत्र्यासाठी असंख्य ज्ञात अज्ञात नररत्नांनी, रणरागिनींनी स्वातंत्र्याच्या बलिवेलीवर आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. देश परकीयांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य व्हावा यासाठी परकीयांना विरोध करून हाल अपेक्षा सहन केल्या, त्यांचे स्मरण करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. स्वातंत्र्य हे पिढ्यान पिढ्या केलेल्या संघर्षातून मिळालेले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये थोरा मोठ्यांपासून लहानांपर्यंत सर्वांचा सहभाग होता. हा लढा कोण्या एका धर्माचा नसून मानवतेच्या रक्षणासाठी उभारलेला एक जगाच्या इतिहासातील अजरामर असा लढा होता.

1942 मध्ये महात्मा गांधीजींनी मुंबईमध्ये गवालिया टॅंक मैदानावर सभा घेतली होती. महात्मा गांधीजींनी आपल्या ओजस्वी भाषणांनी ब्रिटिश सरकारला येथून चालते व्हा! Quit India चळवळ चालू करून सर्व भारतीय लोकांना एकजुटीने ब्रिटिशांविरुद्ध बंडाचे निशाण फडकवा आणि भारतातून त्यांना सळोकी पळो करुन सोडा असा संदेश दिला. चले जाव घोषणे द्वारे चालू केलेली चळवळ म्हणजेच स्वातंत्र्याचे अखेरचे पर्व होते.

स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय आता थांबयचे नाही या भूमिकेतून प्रत्येक भारतीय नागरिक रस्त्यावर उतरला होता. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात चळवळीचे लोन पसरले होते. यामध्ये महाराष्ट्रात चले जाव चळवळीची धार काही वेगळीच होती. कारण महाराष्ट्रातील आंदोलनात शेतकरी, कामगार, कष्टकरी, अबालवृद्ध, बालक आणि महिला या लढ्यामध्ये अनेक क्रांतिकारकांचे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष घेऊन चल जाव चळवळ यशस्वी करण्यात योगदान होते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये क्रांतीसिंह नाना पाटील, वसंतदादा पाटील, पांडू मास्तर, जि.डी लाड, नागनाथ नायकवडी, क्रांतिवीर बापू गुरव व अनेक सहकारी क्रांतिकारक पश्चिम महाराष्ट्रातील सातारा - सांगली - कोल्हापूर या भागामध्ये हे क्रांतिकारक आघाडीवरती होते. क्रांतीसिंह नाना पाटील, वसंत दादा पाटील यांच्या गुप्त कारवाया धाडसाने व कोणतेही मोहीम पूर्ण केल्याशिवाय मागे न हटणारे बापू गुरव सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील मु.पो.कामेरी गावामध्ये शिक्षणा नंतर शासकीय नोकरी मिळत असून सुद्धा ती नाकारून स्वातंत्र्य चळवळीत मोलाचे योगदान देणारे क्रांतिवीर बापू गुरव यांच्या कामाचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे. स्वातंत्र्य चळवळीत त्यांच्या कामगिरीची नोंद इतिहासात होणे गरजेचे आहे बापू गुरव यांच्या विचारांच्या प्रेरणेतून व संघर्षाचा आढावा समाजासमोर आणावा व नाविन पिढीला तो प्रेरणादायी ठरावा हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

**अपरिचित स्वातंत्र्य सैनिक बापू तुकाराम गुरव यांचे पूर्वायुष्य :-**

बापू तुकाराम गुरव यांचा जन्म 1910 मध्ये मु. पो. कामेरी, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथे एक सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांना पाच भावंडे होती. ते लहानपणापासून शिक्षणात हुशार असल्याने त्यांच्या मातोश्री चंद्राबाई यांनी त्यांना आपले भावाकडे तासगाव (आरवडे ) येथे पाठवले. तेथे त्यांचे सातवीपर्यंतचे शिक्षण झाले. शिक्षणात हुशार, शरीराने सडपातळ, उत्तम सोंग घेण्याची कला, निशानेबाजीत तरबेज व भजन कीर्तन मध्ये त्यांना खूप रस होता. ते स्वतः प्रवचन पर कार्यक्रम सादर करीत होते. त्यामुळे गावोगावी त्यांचा मित्रपरिवार होता. त्यामुळे ते गुरव बुवा या नावाने प्रसिद्ध होते.

**क्रांतिकार्याची प्रेरणा :-**

चले जाव च्या मंत्राने सारा देश पेटून उठला. गोळीबार, लाठीमार, अश्रूधूर, अगदी बॉम्ब टाकून लढा दडपून टाकण्याचा पाशवी प्रयत्न साम्राज्य सत्तेने केला. मान्यवर नेते पकडले गेले तरी लढा चालू ठेवण्याचा निर्धार सामान्य जनतेचा होता. लढ्याची सूत्रे भूमिगत कार्यकर्ते, शाळा - कॉलेजमधील विद्यार्थी, शेतकरी, कामकरी, गावकरी यांच्याकडे आली. स्वातंत्र्य लढ्यात सांगली जिल्हा व वाळवा तालुका मागे नव्हता. ऑगस्ट पासून वाळवा

इस्लामपूर भोवतालच्या परिसरात अनेक भागात प्रभात फेऱ्या, मोर्चे चावड्या ताब्यात घेणे वगैरे उपक्रम चालू होते.

वाळवा तालुक्यामध्ये प्रचंड मोर्चे निघत होते. त्यांचा अचूक अबोल परिणाम त्यांचेवर होऊन त्यामध्ये ते सहभागी होऊन भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या चळवळीमध्ये बापू गुरव सहभागी झाले. ते शिक्षित व हुशार, व्यक्तिमत्ववादी व भजन - कीर्तन यांचा छंद असणारे तसेच निशानेबाजी अत्यंत निष्पन्न होते. त्यांच्या स्वातंत्र चळवळीच्या सहभागामुळे स्वातंत्र्य चळवळीला एक हुशार व तरबेज असा योद्धा मिळाला.

**अपरिचित स्वातंत्र्यसैनिक बापू तुकाराम गुरव यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कार्य :-**

**भजन-कीर्तन कार्यक्रमातून स्वातंत्र्य चळवळीचा प्रचार केला :-**

बापू तुकाराम गुरव हे कीर्तन प्रवचन कार्यक्रम करीत होते. 1942 चले जाव चळवळीचे वारे वाळवा तालुक्यात वाहत होते. वरिष्ठ व प्रमुख नेत्यांना स्थानबद्ध केल्यामुळे चळवळीचे काम सर्व घटकावर अवलंबून होते. अशावेळी गावोगावी कीर्तन - भजन कार्यक्रम आयोजन करून लोकांना स्वातंत्र्य चळवळीविषयी जागरूकता, देशासाठी लढण्याची प्रेरणा त्यांनी निर्माण केली. त्यांनी अनेक क्रांतिकारीना चळवळीमध्ये सहभागी केले.

**स्वातंत्र्य चळवळीसाठी वेळप्रसंगी मंदिरामध्ये राहून दिवस काढले पण कागदपत्रे इंग्रजांना मिळू दिली नाहीत. :-**

के.डी.पाटील, पांडू मास्तर यांच्या नेतृत्वाखाली किर्लोस्करवाडी येथे काढलेल्या मोर्चामध्ये अनेक शेतकरी सहभागी होते. त्यावेळी बापू गुरव हेही या मोर्चात सहभागी असताना इंग्रजांनी अचानक धर पकड मोहीम राबवली. प्रमुख नेत्यांना अटक होणार अशावेळी बापू गुरव यांनी चळवळीचे महत्त्वाचे कागदपत्रे घेऊन पलायन करून सैदापूरच्या (कराड) देवळामध्ये पाच दिवस लपून बसले. पुढे इंग्रज सरकारचा बंदोबस्त इतर ठिकाणी गेल्याबरोबर पुन्हा स्वातंत्र चळवळीचे कागदपत्रे देऊन ते पुन्हा आपल्या सहकारी मित्रांकडे गेले.

**विश्रामबाग रेल्वे स्टेशन जाळली :-**

वसंतदादा पाटील, पी.बी. पाटील व गणपत कोळी यांनी नियोजन करून विश्रामबाग रेल्वे स्टेशन जाळण्याचे ठरवले. त्याप्रमाणे वसंतदादा, जीनपाल खोत, रंगराव पाटील, ईश्वरा गुरव, बापू गुरव, पी.बी.पाटील रेल्वे स्टेशन गाठले. बापू गुरव यांनी हातातील भाल्याने गॅंगमनला पकडून ठेवले. इतरांनी इमारतीवर रॉकेल टाकून आग लावली. रेल्वे स्टेशन जाळून क्रांतिकारी पद्मामाळे, सांगली परिसरातला लपाण्या साठी निघून गेले.

**किर्लोस्करवाडीत टपालाची गाडी लुटली :-**

इंग्रज सरकारने जमा केलेला महसूल हा पोस्टाच्या गाडीमार्फत किर्लोस्करवाडी मार्गाने साताराकडे जाणार होता. अशा वेळी कामेरी गावातील क्रांतिकारी बापू गुरव,अण्णा गुरव, रंगराव पाटील, सहकाऱ्यांनी किर्लोस्करवाडी टपालाची गाडी डोंगरांमध्ये अडवून लुटली व लुटीचा पैसा स्वातंत्र्य चळवळीसाठी जमा केला.

**लग्नाचे दुसरे दिवशी इस्लामपूर कचेरीकर मोर्चात सहभागी झाले. :-**

1944 मध्ये त्यांचे लग्न झाले. लग्नाचे दुसरे दिवशी इस्लामपूर कचेरीवर पांडू मास्तर व जी.बी. लाड यांच्या नेतृत्वाखाली मोर्च्या निघणार होता. देशापेक्षा कोणतेही गोष्ट प्रिय व महत्त्वाची नाही अशा या क्रांतिकारकाने या मोर्च्या मध्ये सहभागी घेतला. मोर्चातील गोंधळामुळे ब्रिटिश सरकारने मोर्चा दडपण्यासाठी मोर्चामधील लोकांना, नेत्यांना अटक केली. त्यावेळी बापू गुरु यांनाही अटक झाली व त्यांना तासगाव जेलमध्ये पाठवण्यात आले पुढे त्यांची सहा महिन्यानंतर सूटका झाली.

**कारंडवाडीची चावडी जाळली :-**

चावडी हे शासनाचे अखेरचे मूळ. गावागावातील ही मुळे धरून उपटली तर इंग्रजी सत्तेचा वृक्ष क्षणात कोसळल्या शिवाय राहणार नाही यासाठी जिमपाल खोत, गणपत कोळी, पी. बी. पाटील, बापू गुरव, अण्णा गुरव व सहकार्यांनी नियोजन करून रॉकेल टाकून चावडी जाळली.

**वाळवा तालुक्यामध्ये संदेश वितरण व्यवस्था :-**

क्रांतिकारी चळवळीमध्ये भूमिगत असणाऱ्या व गावोगावी असणाऱ्या क्रांतिकारकांसाठी त्या त्या भागांमध्ये संदेश पाठवण्यासाठी गुप्त व विश्वासू साथीदारांची निवड केली जात होती. वाळवा व इस्लामपूर

परिसरामध्ये वसंत दादा व नाना पाटील यांच्या विश्वासामध्ये बापू गुरु व त्यांचे तीन सहकारी संदेशांची देवाण-घेवाण करीत असत.

**गोफन चालवण्यामध्ये पटाईत होते :-**

बापू गुरव हे नाना पाटील यांचे विश्वासू साथीदार व पाठीराखे होते. इस्लामपूर परिसरातून नाना पाटील व क्रांतिकारी जाणार असल्याची बातमी मिळाल्याने इंग्रजांनी तपासणी मोहीम राबवली. इस्लामपूर मधून क्रांतिकारी मल्ल्ययाच्या डोंगरावर जाणार होते. पोलीस पाठीमागे लागल्याने खूप त्रास झाला होता. अश्यावेळी गोफण मारण्यात पटाईत असणाऱ्या बापू गुरव व सहकाऱ्यांनी झाडांच्या आडाने गोपनामधून दगडांचा मारा पोलिसांवर करून त्यांना पळता भुई करून सोडले.

**1946 मध्ये किर्लोस्करवाडी पोस्टाची गाडी लुटी मध्ये त्यांना अटक : -**

1946 मध्ये त्यांनी आपल्या साथीदारांसोबत किलोस्करवाडीतील पोस्टाची गाडी लूटण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी बंदूक रोखून त्यांना शरण येण्यास भाग पाढले. त्यावेळी बापू गुरव, रंगराव पाटील स्वतः अटक होऊन बाकी स्वातंत्र्यसैनिकांना तेथून पळून जाण्यास सांगितले. इतर साथीदारांची नावे त्यांनी सांगावी याकरता त्यांना अमानुष मारहाणही झाली. पण त्यांनी इतरांची नावे सांगितले नाहीत. त्यांना तासगाव जेलमध्ये पाठवण्यात आले पुढे त्यांना सातारा जेल व त्यानंतर त्यांना येरवडा जेलमध्ये पाठवण्यात आले. त्यांच्यावर लूट व सरकारी मालमत्ता जाळणे, करात सहभागी होऊन सरकार विरोधी कृत्य करणे या वेगवेगळ्या कारणांमध्ये त्यांना सहा वर्षाचा तुरुंगवासाची शिक्षा झाली. पुढे भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्यांना शिक्षेमधून सोडण्यात आले.

**देश स्वातंत्र्यानंतर ही खादीचा प्रसार केला :-**

बापू गुरव हे उत्तम दर्जाचे शिंपी होते. देश स्वातंत्र्यानंतर त्यांनी खादीचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी स्वतः टेलरचे दुकान गावांमध्ये टाकले. शिक्षित असून सुद्धा त्यांनी व्यवसाय करण्यामध्ये भर दिला. पुढे जाऊन त्यांनी आपल्या मुलग्यालाही इस्लामपूर मध्ये टेलरचे दुकान टाकून दिले.

**1965 मध्ये गावांमध्ये आदर्श निर्माण केला :-**

1965 मध्ये खेळाडू दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. गरीब व भूमिहीन लोकांना अन्न मिळणे अवघड होते. अशावेळी बापू गुरव यांनी घरातील ज्वारी व भात गावच्या चावडीमध्ये जमा करून एक आदर्श निर्माण केला. त्यांच्या आदर्श मुळे पुढे गावांमध्ये अन्न धान्य जमा करण्याची होड निर्माण झाली.

**1990 मध्ये ग्रामपंचायत सभेमध्ये भाषण :-**

1985 मध्ये त्यांना लकवा मारला होता. पण शरीर प्रकृती पुन्हा बरी होऊन त्यांनी 1990 मध्ये गावातील ग्रामपंचायत सभेमध्ये प्रोत्साहन पर भाषण केल्याची नोंद ग्रामपंचायत दफ्तरी आढळतात. अशा शिक्षित व देश प्रेमी क्रांतिकारकाचा मृत्यू 27/12/1994 मध्ये झाला त्यांना व त्यांच्या कार्याला कोटी कोटी प्रणाम.

**समारोप –**

गांधीजींनी 1942 च्या स्वातंत्र्यलढ्यात 'चले जाव' हाक दिल्याने देशभरातून अनेक लोक या लढ्यामध्ये सहभागी झाले.सांगली जिल्ह्यातील शिक्षित व हुशार असे बापू तुकाराम गुरव स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभागी होते. देशाला स्वातंत्र्य मिळावे या हेतूने आपले घर कुटुंब सोडून स्वातंत्र्य लढ्यामध्ये ब्रिटिशांविरुद्ध कारवायांमध्ये सहभाग घेऊन ब्रिटिश सरकारला जेरीस आणले होते. त्यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला होता. आपल्या शिक्षणावर नोकरी न करता देशासाठी त्यांनी सर्व त्याग केला. त्याच बरोबर भजन कीर्तन माध्यमातून क्रांतिकारी चळवळीचे काम पुढे घेऊन जाऊन चळवळीला बळकटीपणा दिला. आपल्याला मिळालेले काम त्यांनी निष्ठापूर्वक केले व वेळ प्रसंगी कारावास भोगला. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी मोर्चामध्ये सहभागी होऊन त्यांना कारवास झाल्याचे आढळते. असे हे शिक्षित पण देशाच्या सेवेसाठी तत्पर असणारे बापू तुकाराम गुरव यांच्या शौर्या यावर अधिक अधिक संशोधन झाले पाहिजे. त्यांच्या कार्याचा वारसा स्मृती जपायला हवा. स्वातंत्र्यानंतर केलेलीं देशसेवा सदैव स्मरणात राहणारी आहे. म्हणूनच बापू गुरव हे तरुण पिढी समोर एक आदर्श आहेत.

**संदर्भ सूची**

१. मुलाखत, श्री. शशिकांत बापू गुरव, क्रांतिकारक बापू तुकाराम गुरव यांचे पुत्र, यांची दिनांक २०/ २/ २०२३ रोजी घेतलेली मुलाखत.

२. मुलाखत श्री. डॉ. बाबुराव गुरव जेष्ठ साहित्यिक, सांगली जिल्हा स्वातंत्र्यलढा अभ्यासक यांची दिनांक २० / २ /२०२३ रोजी घेतलेली मुलाखत.

३. देवदत्त पाटील : शर्थ, दीक्षित आर्ट्स, पुणे, पहिली आवृत्ती २००६ पृष्ठ क्रं. २५ व २६

४. बाळासाहेब भारदे - सांगली जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा, रंगनाथ मुद्रण, मुंबई पहिली आवृत्ती २००५ पृष्ठ क्र. ०७ व ०८

५. कित्ता, पृष्ठ क्र. ३१

६. डॉ. आप्पासाहेब शिंदे : साताऱ्याचे प्रतिसरकार, उषा प्रकाशन कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, २०१६, पृष्ठ क्र ०९

७. कित्ता पृ.क्र. ३१

८. महाराष्ट्र शासन, स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश पोस्ट (खंड-ड ) पृष्ठ क्र. ३५७

९. बिवलकर एस. आर.नाना पाटील (चरित्र) देशमुख आणि कंपनी पुणे, पहिली आवृत्ती २००३, पृष्ठ क्रमांक ६०

१०. जी. डी. बापू लाड पेटलेले व धुमसते स्वातंत्र्य, गुरुदत्त प्रकाशन, सांगली, पहिली आवृत्ती २००१, पृष्ठ क्र. २० व २१